## संपादकीय ......

# कमालीची अस्वस्थता..!

चांद्यापासून बांद्यापर्यंत महाराष्ट्र ढवळून निघालेल्या निवडणुकांचे निकाल लागले. भलेभले मोहरे गळाले, चिल्लर खुर्दा किती संपला याची गणतीच नाही. प्रत्येक आमदाराला मंत्रिपदाची स्वप्ने पडू लागली आहेत. फार पूर्वीच्या काळी कोणतेही मंत्रिपद मिळाले तरी आमदार मंडळी खूश होत असत. केवळ दोन विभाग कोणालाही नको असायचे आणि ते म्हणजे पोरांचे आणि जनावरांचे मंत्रालय नको, अशी सगळ्यांची भावना असायची. पोरांचे म्हणजे शिक्षणमंत्री व्हायला कुणालाही नको वाटायचे आणि जनावरांचे म्हणजे पशुसंवर्धनमंत्री होणे प्रत्येकाच्या जीवावर यायचे. याचे कारण म्हणजे या दोन्ही विभागांना पहिल्यापासून कमी निधी मिळत आहे. यापेक्षा सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, गृह, महसूल ही खाती मलईदार खाती म्हणून ओळखली जातात. मलई म्हणजे दुधावर आलेली साय. ज्या खात्याला निधी कमी आहे, त्या खात्याचे मंत्रिपद घेऊन करायचे काय, असा प्रश्न आमदारांना पडत असतो.

शिक्षणमंत्री हे खरे तर अत्यंत मानाचे खाते समजले पाहिजे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असल्यामुळे येथे शिक्षणावर नेहमीच भर देण्यात आला आहे; परंतु हे खाते घेण्यास कोणी इच्छुक नसते. अगदी जिल्हा परिषदेत निवडून आलेल्या सदस्यालासुद्धा शिक्षण खात्याचा सभापती होण्याचे जीवावर येते. एक तर शिक्षकांचे आणि त्या खात्याचे प्रश्न खूप असतात आणि त्या तुलनेमध्ये कितीही ताक घुसळले तरी लोणी निघण्याची शक्यता अजिबात नसते. हीच परिस्थिती पशुसंवर्धन खात्याची पण आहे. पाच हजार जनावरांमागे एक डॉक्टर असणे अपेक्षित असताना तुलनेत कमी कर्मचारीवर्ग असल्यामुळे पशुवैद्यक सेवेबद्दल तक्रारी सुरू असतात. या सगळ्या तक्रारी ऐकत बसण्यापेक्षा आणि त्यातून काहीच न मिळाल्यापेक्षा सार्वजनिक बांधकाम खात्याचा राज्यमंत्री होण्याची पण लोकांची तयारी असते. आता सध्या आमदार मंडळी मंत्रिपदासाठी लॉबिंग करत आहेत. आणखी आठ दिवसांनंतर एकदा का मंत्रिपद निश्चित झाले की, मग खात्यासाठी लॉबिंग सुरू होईल. तीन पक्षांच्या युतीचे सरकार असल्यामुळे खातेवाटप हा मोठाच कौशल्याचा भाग आहे. येणार्या मुख्यमंत्र्यांवर ही एक मोठी जबाबदारी असणार आहे. मंत्र्यांची निवड आणि मंत्रिमंडळाचे खातेवाटप हा पूर्णतः मुख्यमंत्र्यांचा अधिकार असला तरी आपापल्या पक्षाच्या नेत्याला हाताशी धरून चांगले माप पदरात पाडून घेता येते, याची जाणीव सर्व आमदारांना आहे.

वर म्हटल्याप्रमाणे पोरांचे आणि जनावरांचे खाते सोडून कोणतेही खाते द्या साहेब, अशी अर्जवी मागणी आमदार मंडळी आपापल्या नेत्यांकडे करणार आहेत. आपण सर्वसामान्य लोकांना जे काय होत आहे ते पाहणे याशिवाय काही पर्याय नाही. दरम्यान, रोज सकाळी वाजणारे आवाज अजूनही टिकून आहेत, याचे कौतुक करावेसे वाटते. आलेल्या त्सुनामीसदृश वादळामुळे भला भला पाचोळा उडून गेला. त्यात हे आवाज बंद होतील, असे वाटले होते; परंतु ते काही बंद व्हायला तयार नाहीत. जनता बिचारी आपली मतदान करून निकाल देऊन आपापल्या कामाला लागली आहे. शेतकरी रब्बी पिकाच्या मशागतीमध्ये व्यस्त आहे.

# स्पर्धेत खेळाडूंनी आपले सर्वोत्तम खेळ खेळावा; मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी

## राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अमरावती -अकोला परिमंडलातील क्रिडापटूंची निवड चाचणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

महावितरणच्या क्रिडा स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंना महावितरणच्या राज्यस्तरीय खेळात आपली चमकदार कामगीरी दाखविण्याची संधी महावितरणने उपलब्ध करून दिली असल्याने निवड स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी निवडीसाठी आपले सर्वोत्तम खेळ दाखविण्याचे आवाहन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.फेब्रुवारी २०२५ ला बारामती येथे होणाऱ्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी अकोला आणि अमरावती परिमंडलातील क्रिडापटूंची निवड चाचणी काल वसंत देसाई शासकीय क्रिडा संकुल येथे पार पडली. यावेळी स्पर्धेच्या उध्दाटनाप्रसंगी ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला परिमंडळाचे मुख्य अभियंता सुहास रंगारी होते,यावेळी अधीक्षक अभियंते दिपक देवहाते,अजय शिंदे, अजितपालसिंह दिनोरे,सहाय्यक महाव्यवस्थापक रूपेश देशुमख,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे,अरूण शेलकर,कार्यकारी अभियंते अनिल उईके,गोरक्षणाथ सपकाळे,जीवन चव्हाण,धीरज चव्हाण,राजेश माहुलकर,शशांक पोंक्षे,प्रणाली विश्लेषक नितिन नांदुरकर,यांची उपस्थिती होती.महावितरणमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचा सर्वांगीन विकासासोबत कर्मचाऱ्यातील कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने महावितरणकडून दरवर्षी क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी ते म्हणाले ,तर खेळामुळे दैनंदिन कामामुळे येणारे तणाव कमी होते,सांघिक भावना वाढत असल्याचे मत मुख्य अभियंता सुहास रंगारी यांनी व्यक्त केले.

यावेळी स्पर्धेचे औपचारीक उध्दाटन झाल्यानंतर मुख्य अभियंता सुहास रंगारी आणि मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी सर्व क्रिडा प्रकाराला भेट देत स्पर्धकांना शुभेच्छा देत क्रिडापटूंचा उत्साह वाढविला.अमरावती- अकोला आंतरपरिमंडलीय क्रिडा स्पर्धेत सांघिक आणि वैयक्तिक अश्या एकुण २५ क्रिडा प्रकाराचा समावेश आहे. निवड चाचणीसाठी ३०० स्पर्धक सहभागी झाले होते.झालेल्या निवड चाचणीतून बारामती येथे होणाऱ्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेसाठी सांघिक आणि वैयक्तिक क्रिडा प्रकारातून १४४ ( पुरूष व महिला) क्रिडापटूंची निवड करण्यात आली आहे. २०२५ मध्ये होणाऱ्या महावितरणच्या क्रिडा स्पर्धेत पहिल्यांदा पॉवर लिफ्टींग आणि बॉडी बिल्डींग या दोन नविन क्रिडा प्रकाराचा समावेश करण्यात आला आहे.उध्दाटन कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संजय पुरकर यांनी केले,प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरूण शेलकर यांनी केले,तर क्रिडापटूना सामुहिक शपत भारत डिक्कर यांनी दिली.

# रब्बी कांद्यासाठी पाण्याच्या पाळ्या आणि खत कसे द्याल?

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

रब्बी कांदा लागवडीची लगबग सुरु आहे. काही ठिकाणी रोपवाटिकेचे व्यवस्थापन सुरु आहे. अशा स्थितीत रब्बी हंगामातील कांदा व्यवस्थापन करताना पाण्याच्या पाळ्या आणि खत हे महत्वाचे घटक ठरतात. या लेखातून या दोन गोष्टीचा उहापोह करणार आहोत...

**तण नियंत्रण**

कांदा रोप लागवडी खालोखाल खुरपणीसाठी खूप खर्च येतो. खुरपणीमुळे मुळाशी हवा खेळती राहून कांदा चांगला पोसतो. रब्बी हंगामात तणांचा उपद्रव कमी असतो. कांद्याची रोपे लागवडीनंतर २५ दिवसांनी ऑक्झिफ्लोरफेन ७.५ मिली व क्यूझीलोफॉप इथाईल १० मिली प्रती १० लीटर पाणी या प्रमाणात

विदर्भ प्रजासत्ताक **कृषी विशेष**

तणनाशकाची एकत्रित फवारणी करुन ४५ दिवसांनी एक खुरपणी करावी.

खत व्यवस्थापन

कांदा पिकास हेक्टरी ४०-५० बैलगाड्या शेणखत व शिफारस केल्याप्रमाणे रासायनिक खत




हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पैकी आर्ध नत्र व संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडी पुर्वी वाफ्यात मातीमध्ये मिसळून द्यावे. - राहीलेले ५० किलो नत्र ३० व ४५ दिवसांनी एक खुरपणी करुन द्यावी. साठ दिवसानंतर कांदा पिकास कोणतेही वर खत देऊ नये.

पाणी व्यवस्थापन

कोरड्यात लागवड केल्यास लगेच पाणी द्यावे त्यानंतर दोन दिवसांनी चिबवणी द्यावी. पिकाच्या वाढीबरोबर पाण्याची गरज वाढते. कांदा पिकाच्या पाण्याच्या पाळ्या जमीन, हवामान, हंगाम यावर अवलंबून राहतात. रब्बी कांद्यास १५-२० पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. कांद्याची वाढ पूर्ण होऊन पाने पिवळी पडून माना पडू लागल्या बरोबर पाणी तोडावे. रब्बी हंगामातील पिकांना शेवटी पाण्याची कमतरता भासते. अशा ठिकाणी ठिबक किंवा तुषार सिंचन पध्दतीचा अवलंब करण्याचा विचार करावा. कांदा काढणीपुर्वी तोन आठवडे पाणी तोडावे व ५० टक्के झाडांच्या माना पडल्यावर कांदा काढणीस सुरुवात करावी.

**- डॉ. राकेश सोनवणे, डॉ. रवींद्र पाटील,** कांदा, द्राक्ष संशोधन केंद्र,




## नारळपाण्याचे वरदान

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

नारळाच्या झाडाला आपल्याकडे ‘कल्पवृक्ष’ म्हटले जाते. ओल्या नारळाला ‘शहाळे’ असे म्हणतात. याचे पाणी शक्तिवर्धक, थंड व खनिजसंपन्न असते. आरोग्यासाठी या पाण्याचे खूप फायदे होतात. त्यातील जीवाणूविरोधी गुण शरीराची प्रतिकारक्षमता वाढवण्यास मदत करतात.



शहाळ्याचे पाणी प्यायल्यास रक्ताभिसरण सुधारते. उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवते. त्यामुळे हृदयविकाराचा झटका आणि इतर कार्डियोव्हॅस्क्युलर आजार होण्याचा धोका कमी होतो. रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासही त्याचा उपयोग होतो. वजन कमी करायचे असेल तरीही नारळाचे पाणी उपयुक्त असते. नियमित शहाळ्याचे पाणी प्यायल्यास प्रतिकार क्षमता वाढते. पोषक घटक आणि जीवनसत्त्वे जसे रिबोफोल्विन, नियासिन, थियामिन, पेंटोथेनिक ॲसिड, कोलाईन आणि फोलेटसमुळे यात जीवाणूविरोधी गुण असतात. त्यामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते. यातील खनिजे, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअममुळे व्यक्तींना मूत्राशयाच्या आजारात फायदा होतो. शहाळ्याच्या पाण्यामुळे मूत्रवृद्धी होते. त्यामुळे मूत्रप्रवाह आणि मूत्रप्रवृत्ती वाढते. डॉक्टर महिलांना गर्भावस्थेत शहाळ्याचे पाणी पिण्याचा सल्ला देतात. कारण त्यामुळे बद्धकोष्ठता, जळजळ, पचनतंत्रात बिघाड दूर होण्यास मदत होते.

शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, जुलाब किंवा उल्टी-जुलाब असा त्रास होत असल्यास नारळपाणी प्यावे. नारळपाण्यात इलेक्ट्रोलाईट पोटॅशिअम हँगोव्हर उतरण्यासही मदत करते. नारळाच्या पाण्याचे आरोग्यासाठी असणारे फायदे अनेक असले तरी कोणत्याही शस्त्रक्रियेनंतर पहिले दोन आठवडे नारळाचे पाणी पिऊ नये. कारण शस्त्रक्रिये दरम्यान आणि नंतर रक्तदाब नियंत्रित होण्यामध्ये समस्या निर्माण होतात. व्यायाम केल्यानंतर नारळाच्या पाण्याऐवजी साधे पाणी प्यावे. नारळाच्या पाण्याचे अतिसेवन केल्यास जास्त मूत्रप्रवृत्ती होते. ज्यांची प्रकृती कफाची आहे किंवा थंड प्रकृती असलेल्या लोकांनी शहाळ्याचे पाणी सेवन करू नये.

# लाल परीचा प्रवास महागणार

## शासनाकडे १४ टक्के दरवाढीचा प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मुंबई** एसटी महामंडळाने प्रवासी भाड्यात वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आहे. त्यामुळे नागरिकांच्या खिशाला कात्री लागण्याची चिन्हे आहेत. मागील तीन वर्षांत एसटीच्या तिकिटांची भाडेवाढ करण्यात आली नाही, असे सांगत तब्बल १४.१३ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असल्याची माहिती मिळाली आहे.



भाडेवाढ करणे गरजेचे आहे, त्या शिवाय महामंडळ चालू शकत नाही, सध्याची परिस्थिती पाहता भाडेवाढ झाली नाही तर एसटीवर मोठं संकट उभे राहिले. सध्या नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर यावर शिक्कामोर्तब होईल. मात्र सकारात्मक निर्णय नाही झाला तर जनांदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेस सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे.

# माझ्यावरील आरोप सिद्ध करा

## यशोमती ठाकूर यांनी दिला इशारा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अमरावती** - काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर यांनी आपल्या परिचित शैलीत एक व्हिडिओ जारी करून विरोधकांवर निशाणा साधला आहे. माझ्या विरोधात उभे राहिलेले तथाकथित कंत्राटदार मला पराभूत केल्याचे सांगत आहेत. यशोधरा दूध डेअरीसाठी मी कोणताही प्रकल्प आणला नाही, असा आरोप माझ्यावर होत आहे. देवेंद्र फडणवीस यांनीच यशोधरा दूध डेअरीसाठी सर्वकाही केले. आपल्यावर जमीनहडपकरूनपैसे खाल्ल्याचा आरोप होत असल्याचंही यशोमती ठाकूर यांनी म्हटलं आहे. आता सरकार तुमचे,

मुख्यमंत्रीही तुमचे आणि आमदारही तुमचे, असे स्पष्ट शब्दात त्यांनी सांगितले. अशा परिस्थितीत माझ्यावर होत असलेले आरोप सिद्ध करा, अन्यथा तोंडाला कुलूप लावा. जर कथित ’ठेकेदार’ हे आरोप सिद्ध करू शकले नाहीत, तर माझ्याकडे अशा अनेक गोष्टी आहेत ज्या मी सिद्ध करू शकतो, असा इशारा त्यांनी दिला आहे.

# बिबट्याच्या हल्ल्यामध्ये मृत्यू झाल्यास भरपाईमध्ये मोठी वाढ

**दि.२विदर्भ प्रजासत्ताक**

वन्यप्राण्याच्या हल्लयात गंभीर जखमी, जायबंदी अथवा ठार झाल्यास देण्यात येणाऱ्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. विशेषतः बिबट्याच्या हल्लयात एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास २५ लाख रुपये भरपाईपोटी देण्यात येणार आहेत.

ग्रामीण भागातील वाड्या, वस्त्यांपर्यंत त्याने हल्ले केल्याच्या बातम्या सतत येतात. बिबटे अन्न-पाण्याच्या शोधात मानवी वस्तीमध्ये येतात. शेतकऱ्यांची पाळीव जनावरे, वस्त्यांवरील भटकी कुत्री यांच्या शिकारी करतात.जिल्ह्याच्या पश्चिमेकडील तालुक्यांत ऊस क्षेत्र आणि जंगली क्षेत्र जास्त असल्याने बिबट्यांचा वावर जास्त आहे. बिबट्याच्या हल्लयात मानवी मृत्यू झाल्यास त्याच्या वारसदाराला वन विभागातर्फे २० लाख रुपयांची भरपाई दिली जायची.

आता २५ लाख मिळणार

बिबट्याच्या हल्लयात मानवी मृत्यू झाल्यास त्याच्या




वारसदाराला वनविभागातर्फे २० लाख रुपयांची भरपाई दिली जायची. आता २५ लाख मिळतील.

**या प्राण्यांकडून हल्ला झाल्यास मिळते मदत-** बिबट्या, वाघ, अस्वल, रानगवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, माकड यांच्याकडून हल्ला झाल्यास आर्थिक मदत दिली जाते.

**हल्ला झाल्यास १९२६ वर करा कॉल** -वन्यप्राण्याने हल्ला केल्यास वनविभागाच्या १९२६ या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून माहिती देता येते. त्यानंतर कर्मचारी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा करतात. नुकसान भरपाईसाठी वरिष्ठांना अहवाल देतात.वारसदाराला धनादेश अन् खात्यावर एफडी

मृताच्या जवळच्या वारसदाराच्या नावे भरपाईचा धनादेश दिला जातो. बँक खात्यावर मुदत ठेव ठेवली जाते.

**पशुंसाठीही मिळते भरपाई-** १) बिबट्या अन्नाच्या शोधात मानवी वस्तीमध्ये येत असतात. त्यातून बिबट्याने किंवा वन्यप्राण्याने शेतकऱ्याच्या पाळीव पशूवर हल्ला करून त्याला ठार मारल्यास त्याचीही भरपाई जनावरांच्या मालकास वनविभागाकडून देण्यात येते.

२) वन्यप्राण्यांच्या हल्लयातील मयत किंवा जखमीला ३० दिवसांच्या आत भरपाई देणे बंधनकारक आहे. त्यापुढे विलंब झाल्यास व्याजासह पैसे द्यावे लागतील. तसा निर्णय शासनाने २०२३ मध्ये घेतला आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# जिल्ह्यात रब्बीच्या पेरणीला वेग ६० टक्के पेरणी आटोपली

## अमरावती तालुक्यात सर्वाधिक१२४ टक्के पेरणी पूर्ण

**विर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–**

खरिपानंतर अमरावती जिल्ह्यात सरासरी १ लाख ४८ हजार ८७९ हेक्टर क्षेत्रावर रब्बी पेरणीचे कृषी विभागाच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. आतापर्यंत ८२ हजार २३३ हेक्टरवर पेरणी झाली असून ही पेरणी ६० टक्के आटोपली आहे.

गेल्या वर्षी १ लाख ६१ हजार ४५३ इतक्या हेक्टरवर पेरणी झाली होती. कृषी विभागाच्या वतीने रब्बी हंगामाचे नियोजन केले आहे. त्यात १ लाख ४८ हजार हेक्टरवर रब्बी हंगामाची लागवड होणार आहे. त्यापैकी ८२ हजार २३३ हेक्टरवर पेरणी आटोपली आहे. यामध्ये त्यात गतवर्षी हरभऱ्याला मिळालेला चांगला भाव लक्षात घेता हरभऱ्याच्या पेरणीकडे यंदाही शेतकऱ्यांचा कल आहे. त्यामुळे सर्वाधिक ६५ हजार ९७२ हेक्टरवर हरभरा पिकाची पेरणी होण्याचा अंदाज आहे. याशिवाय गहू, ज्वारी, मका, मोहरी, करडई, तिळ, जवस, सुर्यफुल,अश्या पिकांची लागवड या वेळेस च्या रब्बी हंगामात करण्यात येत आहे.खरीप हंगामात झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शेतकरी आता रब्बी मध्ये प्रयत्न करणार आहे.



### वारंवार विद्युत पुरवठा खंडित

अतिवृष्टीने खरिपातील पिकांची नासाडीझाली. नदी, नाल्याकाठच्या शेतातील पिके खरडून गेली. शेताला तलावाचे स्वरूप आल्याने पिके जळाली. यातून सावरण्याचा प्रयत्न रब्बीच्या हंगामात होत असतानाच वीज कंपनीच्या कारभाराने शेतकऱ्यांपुढे संकट उभे ठाकले आहे. पिकाला पाणी देणे पूर्ण होण्यापूर्वीच वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे रब्बीचे पीकही धोक्यात येण्याची शक्यता वाढली आहे. वीज केव्हा गुल होईल याचा नेम राहिलेला नाही, अशी ओरड शेतकरी करू लागले आहे.

### जलसाठाही मुबलक, सिंचनाचा प्रश्न मिटला

अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठा प्रकल्प असणाऱ्या उर्ध्व वर्धात सद्या ९३.७५ टक्के जलसाठा आहे. त्यामुळे मोर्शी परिसरातील सिंचनातून रब्बी पिकांना मोठा फायदा होत आहे. त्याचप्रमाणे शहानूर प्रकल्पात ९४.१४ टक्के, चंद्रभागात ९८.४४ टक्के, पूर्णात ९६.०१ टक्के, सपनमध्ये ९९.२५ टक्के अशा मोठ्या व मध्यम प्रकल्पात मुबलक पाणी साठा आहे. यासंबंधित पाचबंधारे विभागाद्वारे पाणी वाटपाचे योग्य नियोजन करण्यात आले असून, सिंचनाचा प्रश्न मिटला आहे.

### रब्बीचा पेरा वाढण्याची शक्यता

यंदा जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामाचा शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. परंतू चांगला पाऊस झाल्याने जिल्ह्यातील जल प्रकल्पांमध्ये भरपूर पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे यंदा जिल्ह्यात रब्बी हंगामातील पिकांना सिंचनासाठी मुबलक पाणी उपलब्ध आहे. परिणामी बंदा रब्बीचा पेरा वाढण्याची शक्यता आहे.

## ‘फेइंजल’ चक्रीवादळामुळे

# राज्यातील हवामानाचे गणित बदलले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर : –** ‘फेइंजल’ चक्रीवादळाने राज्यातीलच नाही तर देशातील वातावरणाची गणिते बदलली आहेत. थंडीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या नागरिकांना आता कुठे थंडीचा आनंद घेता येऊ लागला होता. मात्र, फेइंजल ने या आनंदावर विरजण घातले आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या चक्रीवादळामुळे थंडी कमी झाली असून राज्यातील एकूणच कमाल आणि किमान तापमानात वाढ झाली आहे.



फेइंजल चक्रीवादळामुले उत्तरेकडील शीतलहरी राज्याकडे येत आहेत. आज संपूर्ण राज्यातच ढगाळ हवामान आहे. तर भारतीय हवामान खात्याने काही ठिकाणी पावसाच्या तुरळक सरी कोसळतील असा अंदाज व्यक्त केला आहे. राज्यातील अनेक शहरातील कमाल तापमानात मोठ्या प्रमाणात घसरण झाली होती. ३० अंश सेल्सिअस च्या आत हे तापमान होते. मात्र, कालपासून या तापमानात वाढ झाली असून कमाल तापमानाने ३० अंश सेल्सिअसचा पारा ओलांडला आहे. राज्यातील किमान तापमानात देखील मोठ्या प्रमाणात घसरण झाली होती. अनेक शहरांमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षाही कमी झाले होते. त्यामुळे थंडीचा कडाका वाढल्याने अनेक ठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या होत्या. मात्र, कालपासून किमान तापमानात देखील वाढ होऊन ते १५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचले आहे.

दरम्यान आता हवामान खात्याने सोमवारपासून कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या दक्षिणेकडील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह हलक्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. विदर्भात देखील पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील दक्षिणेकडील एटापली आणि सिरोंचा या तालुक्यांमध्ये पावसाच्या तुरळक सरी कोसळतील असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. तसेच भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ या विदर्भातील जिल्ह्यातही पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. नांदेड, लातूर, आणि सोलापूरसह काही इतर जिल्ह्यांमध्ये कमी उंचावरचे ढग पाहायला मिळतील. या ठिकाणी हवामान बदलाचा परिणाम जाणवू शकतो.एकूणच राज्यात पुढील काही दिवस थंडी कमी होत जाण्याची शक्यता आहे. अवकाळी पावसाचा प्रभाव कमी प्रमाणात दिसेल. श्रीलंकेजवळ तयार झालेले चक्रीवादळ ‘फेइंजल’ हळूहळू पश्चिमेकडे सरकत आहे. पुदुचेरीजवळ हे वादळ धडकण्याचा अंदाज आहे.

# मुख्यमंत्री फडणवीसांच्या शपथविधीला जिल्ह्यातून हजारो भाजप पदाधिकारी,कार्यकर्ते जाणार, ‘पास’ नसेल तर ‘नो एन्ट्री’

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मुख्यमंत्री आणि राज्याच्या नव्या सरकारचा गुरुवार ५ स्टेडियमवर दिमाखदार पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपमुख्यमंत्र्यासह डिसेंबर रोजी मुंबईतील उपस्थितीत होणार आहे. सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी भाजपचे अनेक पदाधिकारी मुंबईला रवाना होण्याच्या तयारीत आहेत. शनिवारी भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ’झूम’ बैठकीच्या माध्यमातून या कार्यक्रमाची सविस्तर माहिती सर्वांना दिली होती. या कार्यक्रमात सहभागी व्हायचे असेल तर ज्यांच्याकडे ’पास’ असणे आवश्यक आहे, त्याबाबत पूर्व माहिती देऊन आता ज्यांच्या नावाने पास बनवला जाईल तेच भाजपचे पदाधिकारी या ऐतिहासिक कार्यक्रमात सहभागी होऊ शकणार आहेत. कार्यक्रम मात्र आपले नाव पुढे येईल की नाही, याची प्रतीक्षा असतानाच सर्वांनी तयारी सुरू केली आहे.

अमरावती शहरातील भारतीय जनता पक्षाच्या शहर कार्यकारिणी आणि महिला–पुरुष पदाधिकाऱ्यांसोबत संवाद साधला असता त्यांनी सांगितलेकी, शहर कार्यकारिणीअंतर्गत ३० ते ४० स्त्री– पुरुष प्रमुख पदाधिकाऱ्यांची टीम मुंबईला रवाना होणार आहे. यामध्ये शहराध्यक्ष प्रवीण पोटे पाटील, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, चेतन पवार, प्रा. दिनेश सूर्यवंशी, जयंत डेहनकर यांच्याशिवाय महिलांमध्ये सुरेखा लुंगारे, संध्या टिकले, श्रद्धा गेहलोत, लविना हर्षे, रिटा मोकळकर, शीतल वाघमारे, बरखा बोच्वे आदींचा समावेश असणार आहे. ५०० पदाधिकारी, कार्यकर्ते मुंबईतचमुंबईत आयोजित करण्यात आलेल्या शपथविधी कार्यक्रमासाठी भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते आधीच मुंबईत ठाण मांडून आहेत. या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळण्यासाठी ५०० हून अधिक अधिकारी आधीच मुंबईत पोहोचले आहेत. अशा चर्चा सुरू झाल्या आहेत.





### ’पास’ नसेल तर ’नो एन्ट्री’

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्याकी, ज्या भाजपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नावे यादीत असतील त्यांनाच कार्यक्रमस्थळी तयार केलेल्या पासच्या आधारे प्रवेश दिला जाईल. पासशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. त्यामुळे त्या यादीत आपलं नाव यावं यासाठी प्रत्येक जणांची स्पर्धा लागली आहेय सोमवार, २ डिसेंबर रोजी सायंकाळी उशिरा सर्व पदाधिकारी, कार्यकत्यांना पासेस उपलब्ध करून दिल्या जातील.

या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे ग्रामीण भागातील पदाधिकारीही सहभागी होत आहेत. जिल्ह्यातील भारतीय जनता पार्टी व महायुतीचे नवनिर्वाचित आमदार सुलभा खोडके, रवीराणा, प्रताप अडसड, प्रवीण तायडे, केवलराम काळे, उमेश यावलकर, राजेश वानखडे, जिल्हाध्यक्ष तथा खासदार डॉ. अनिल बोंडे, निवेदिता चौधरी, जिल्हाध्यक्षा अनिता तिखिले यांच्यासह अनेक अधिकारी ५ डिसेंबर रोजी आयोजित कार्यक्रमासाठी ४ डिसेंबरलाच सायंकाळी मुंबईकडे रवाना होतील.

# १४ ते २१ डिसेंबर दरम्यान गाडगेबाबा पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती–** श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन गाडगेबाबा समाधी स्थळ गाडगेबाबा नगर अमरावती च्या वतीने आयोजित केला आहे.

१४ डिसेंबर ते २१ डिसेंबर दरम्यान भागवत सप्ताह म्हणजेच ज्ञानदान अंअमतन्नदान कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. १४ डिसेंबरला या कार्यक्रमाचा शुभारंभ सकाळी दहा वाजता गाडगेबाबा च्या समाधीची पूजन व पुण्यतिथी महोत्सव शुभारंभ होणार आहे. महानगरपालिका आयुक्त व प्रशासक सचिन कलंत्रे यांच्याहस्ते, गाडगे महाराज मिशन मुंबईचे उपाध्यक्ष उत्तमराव उर्फ बापूसाहेव देशमुख यांच्या उपस्थितीत, डॉ राजकुमार लंगडे या मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम होईल. सकाळी साडेदहा ते साडेबारा दरम्यान श्रीमद्भागवत कथा होणार असून ह भ प वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांच्या हस्ते शुभारंभ होणार आहे. दुपारी साडेबारा ते एक च्यादरम्यान अंध अपंगनिराश्रीतवृद्ध पुरुष यांना नामदेवराव रोडे यांचे स्मृती प्रित्यर्थ राधानगर अमरावती यांच्या वतीने अन्नदान नंतर दुपारी एक ते दोन महिला



मंडळाचे भजन राष्ट्रसंत महिला भजन मंडळसंचालिका आशाताईकेचेवसंच यांचा भजनाचा कार्यक्रम व त्यानंतर दुपारी दोन ते साडेचार दरम्यान श्रीमद् भागवत कथा वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांचे भागवत त्यानंतर साडेचार ते साडेपाच ह भ प लक्ष्मीबाई गहू कार यांचे गाडगेबाबाच्या जीवन कार्यावर प्रवचन व त्यानंतर साडेपाच ते साडेसहा हरिपाठ सामुदाय प्रार्थना बापूसाहेब देशमुख व त्यांचे सहकारी सायंकाळी साडेसात नऊ वैशालीताई पाटील यांचे भारुड व राष्ट्रीय कीर्तन रात्री नऊ ते साडेदहा ह भ प शिवदास महाराज शृंगारे यांचे राष्ट्रीय किर्तन होणार आहे त्यानंतर १५ डिसेंबर ते २० डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रम आयोजित केले असून दैनंदिनी मध्ये सकाळी पाच ते काकड आरती सात वाजता समुदायिक प्रार्थना बापूसाहेब देशमुख व सहकारी त्यानंतर श्रीमद् भागवत कथाप्रवक्ते हभप वाणीभूषण सोपान महाराज सरोदे यांची भागवत हे सर्व २० डिसेंबर पर्यंत राहणार आहे. २१ डिसेंबरला सकाळी सात ते साडेसात सामुदायिक प्रार्थना व बाबाच्या समाधीचे पूजन व त्यानंतर गाडगेबाबांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा गाडगेबाबा समाधी मंदिरातून निघणार आहे. कार्यक्रमांमध्ये भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख व्यवस्थापक प्रकाश महात्मे, प्रसिद्धी प्रमुख गजानन देशमुख यांनी केले आहे.

# कालव्याचे पाणी घुसले, शेतकऱ्यांच्या शेतात शेतकऱ्यांचे नुकसान

## जसापुर मौजा मधील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२चांदुर बाजार**

तालुक्यातील पूर्णा प्रकल्पाच्या कालव्याचे पाणी घुसल्याने जसापुर मौजा मधील अविनाश शेरेकर यांच्यासह आणखी काही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पाणी घुसून पिकाचे नुपसान झाले आहे. या नुकसानीला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करून नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांमधून केली जात आहे. दोन वर्षापासून या पूर्णा प्रकल्पाच्या जसापुर कालव्यावर वर कोणत्याही शेतकऱ्याची ओलितासाठी पाण्याची मागणी केली नसल्याने हा कालवा दोन वर्षापासून बंद होता. यावर्षी माधान परिसरातील शेतकऱ्यांनी शेतीच्या ओलितासाठी पाण्याची मागणी केल्याने या कालव्याला पाणी सोडले असल्याचे पूर्णा प्रकल्पाच्या जुनियर इंजिनियर सुबोध पंडित यांनी सांगितले. या कालव्याला पाणी सोडण्यात आल्याने कालव्याच्या व कालव्याची कुठल्याही प्रकारे साफसफाई न झाल्याने पाणी कालवा पूर्ण भरून ओव्हर फ्लो होऊन ते पाणी आपल्या शेतामध्ये गेल असून कालव्याला पाणी सोडताना आम्हाला कुठलीही माहिती देण्यात आली नसल्याचे ही शेतकरी शेरेकर यांनी सांगितले. पूर्णा प्रकल्पाच्या कालव्यांची या वर्षी साफसफाई झाली नसल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. त्यामुळेही पाणी कालव्यामध्ये न राहता कालवे ओव्हर फ्लो होहून वाहत होते. त्यामुळेही कालव्याचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये शिरूर शेतीचे नुकसान झाले आहे. पावसाळा संपल्यानंतर सुकलेली नालेही या कालव्याच्या ओव्हरफ्लो मुळे पुन्हा काहीशे वाहू लागले आहे.

पाण्याची उचल कमी झाल्याने शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसले. नुकसान झालेल्या बारा शेतकऱ्यांची नावे आमच्याकडे आली आहे. त्यांचे पंचनामे करणार आहोत.

– **सुबोध पंडित,** कनिष्ठ अभियंता पूर्ण प्रकल्प

-----------------------------------

नुकसानीला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून आम्हाला नुकसान भरपाई द्यावी!

– **अविनाश शेरेकर,** शेतकरी



# अपघातानंतर शिवशाहीचा स्पीडवर कंट्रोल !

## प्रवाशांमध्ये भीती : परिवहन विभागाकडून उपाययोजना सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती –** सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा-खजरीजवळ झालेल्या शिवशाहीच्या अपघातानंतर शनिवारी (दि.३०) जिल्ह्यातील मार्गावरून शिवशाही बस हळूहळू धावत होत्या. अपघाताची धास्ती आणि लोकांचा जनाक्रोश पुन्हा होऊ नये यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने शिवशाहीच्या स्पीडवर कंट्रोल आणल्याचे चित्र पाहायला मिळाले. त्यामुळे शिवशाहीची स्पीड कमी झाल्याची चर्चा जिल्हाभरात होती.

शुक्रवारी शिवशाही बसचा झालेला अपघात हा अतिवेग आणि चालकाच्या चुकीमुळेच झाल्याची बाब प्राथमिक चौकशीत पुढे आली आहे. तर याला महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनीसुद्धा दुजोरा दिला. चालकाने वेग वाढवून अचानक ब्रेकमारल्याने बस अनियंत्रित झाली आणि




चालकाचे नियंत्रण बिघडल्याने बस उलटल्याचे आता स्पष्ट झाले आहे. या अपघातात ११ प्रवाशांचा बळी गेला.

त्यामुळे प्रवासी आणि नागरिकांमध्येसुद्धा रोष व्याप्त आहे. त्यामुळे शनिवारी (दि.३०) अमरावती जिल्ह्यातील मार्गावरून शिवशाही बसेस धावताना वेग कमी ठेवण्याच्या सूचना चालकांना विभागाने दिल्याची माहिती

आहे. त्यामुळे शिवशाही बसेस फार हळू धावत असल्याचे चित्र अमरावती जिल्ह्यात अनेकांनी पाहिले. शिवशाहीचा वेग अचानक कसा कमी झाला याचीच जिल्ह्यात दिवसभर चर्चा होती.

शिवशाही बसेसच्या गुणवत्तेवर प्रश्न चिन्ह

एसटी महामंडळाच्या ताफ्यात ८९२ शिवशाही बसेस आहेत. कोराना काळात प्रवासी सेवा बंद असल्याने महामंडळाची आर्थिक स्थिती डबघाईस आली होती. परिणामी शिवशाही बसेसच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाले. या बसेसच्या सुट्या सामानांचा पुरवठा होत नसल्याने काही शिवशाहीची स्थिती अत्यंत बिकट आहेत. शिवाय तांत्रिक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने या बसेसची दुरुस्ती वेळीच होत नसल्याने अपघात वाढत असल्याची माहिती आहे.

# दिशादर्शक फलकावरून निर्देशित शहरे गहाळ

## वाहनधारकांनी केली दुरुस्तीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२अचलपूर :** वाहन चालविताना कुठल्या रस्त्याने जावे आणि किती किलोमीटर अंतर जावे लागेल, याची माहिती वाहनधारकांना मिळावी यासाठी महामार्गावर दिशादर्शक नामफलक लावल्या जातात. याच कारणास्तव नामफलक (प्रवेशद्वार) परतवाडा-अमरावती मार्गावरील अचलपूर नाक्याजवळ उभारण्यात आले आहे. सदर फलकावरील शहरांची नावे गहाळ झाली आहे. त्यामुळे कधीकाळी महामार्गासह शहराच्या सौंदर्यातभर टाकणाऱ्या सदर फलकामुळे वाहनधारकांचा गोंधळ उडत आहे. मात्र, सदर



दिशादर्शक फलकाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत आहे. लहान-मोठ्या राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर दररोज २४ तास मोठ्याप्रमाणात वाहनांची वर्दळ असते. वाहनधारकांना नियोजित ठिकाणी अचुकपणे पोहोचता यावे, यासाठी दिशादर्शक फलक लावले जातात. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना खांब उभे करुण त्यावर भला मोठा लांबलचक आडवा फलक लावला जातो. त्यावर ज्या शहराकडे रस्ता जातो, त्या दिशेला बाण आणि त्यापुढे शहराचे अंतर किलोमीटरमध्ये ठळक अक्षरातनमुद असते. त्यामुळे वाहनधारकांना चटकन माहिती मिळाल्याने त्याचा प्रवास सुखकर होतो. त्यासाठीसदरचे फलक सुस्पष्ट आणि ठळक असावे लागते. त्यामुळे अशा फलकाची निगा राखणे आवश्यक असते. सदरचे फलक वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने शासनाकडून यावर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. या निधीचा सदुपयोग होणे अपेक्षित आहे. मात्र, अचलपूर नाक्याजवळ असलेल्या सदर फलकाकडे दृष्टीक्षेप टाकला असता फलकावरील अक्षरे डागाळलेली आहे. त्यामुळे सदर फलक कुचकामी ठरला आहे. त्यावर केलेला खर्चही निरर्थक ठरतो आहे. त्यामुळे बैतुल, इंदोर किंवा अकोल्याकडून अमरावती, चांदूरबाजार, अचलपूर शहर या रस्त्याने जाणाऱ्या आणि विरुद्ध दिशेने येणाऱ्या वाहनचालकांना या फलकावरून काहीच अर्थबोध होत नाही. उलटपक्षी या ठिकाणी वाहन चालविताना चालकांचा गोंधळ उडतो. अचलपूर विभागाचे कार्यकारी अभियंता आणि त्यांच्या अधिनस्त उपविभागीय अभियंता यांच्यासह त्यांच्या दिमतीला असलेले वरिष्ठ आणि कनिष्ठ अभियंते या गंभीर विषयाकडे गांभीर्याने पाहतील का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

# अजगराने केली रोईच्या पिल्लू ची शिकार, सर्पमित्राने केले रेस्क्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ नेरपिंगलाई –** अमरावती रोडवरील नेर पिंगळाई येथील शेतात भल्या मोठ्या अजगराने रोईच्या पिल्लूची शिकार केली.

स्थानकीय शेतकरी यांना त्यांच्या झोपडी मध्ये अजगर जातीचा साप दिसल्या बरोबर त्यांनी मोर्शी येथील सर्पमित्रांना माहिती दिली.व सर्पमित्रांनी त्या अजगराला सुरक्षित पकडून



शिरखेड वन विभागाचे अधिकारी एफ.जी खेरकर यांच्या ताब्यात दिले.

माहिती नुसार नेर पिंगळाई येथील शेतात रोईच्या पिल्ल्याची शिकार करून शेतातील झोपडी मध्ये हा अजगर आढळून आला . स्थानकीय शेतकरी यांनी अजगर जातीचा साप दिसल्यास त्यांनी ताबडतोब सर्पमित्रांना बोलावले. सर्पमित्र प्रियांशु तायवाडे, रोहित अमझरे, विवेक सावरकर, राज कुरवाडे, सुरज धुर्वे, राहुल पंडागरे, यांनी त्वरित शेतात जाऊन अजगराला पकडले.

सर्पमित्रांच्या कार्याबद्दल शेतकरी व स्थानिक लोकांनी त्यांचे अभिनंदन केले.

# ढगाळ वातावरणामुळे तुरीवर संकटाचे 'ढग'

## किडीचा प्रादुर्भाव होण्याची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२मोर्शी** सद्यस्थितीमध्ये ढगाळ वातावरण असल्याने तूर पिकावरही संकटाचे 'दाग' निर्माण होण्याचे चित्र दिसून येत आहे. या बातावरणामुळे किडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता शेतकरी वर्गाकडून वर्तविण्यात येत आहे. त्यामुळे तुरीवर किडनियंत्रक किटकनाशकांच्या फवारण्या करण्यासाठी शेतकऱ्यांच्या खिशावर आर्थिक ताण पडणार आहे. सद्यस्थितीमध्ये मोर्शी परिसरात तूर पीक जोमात असल्याने तुरीच्या झाडांना फुलोर असून शेंगासुद्धा धरल्या आहेत. मागील दोन वर्षांपासून तुरीला प्रतिक्विंटल १० हजारांपेक्षा जास्त भाव आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी यावर्षी आंतरपीक महणून आणि माडी तुरीची मोठ्या प्रमाणात पेरणी केली. यावर्षी अतिपावसामुळे शेतकऱ्यांच्या तूर पिकाचे मोठे नुकसान झाले आहे; मात्र ज्या शेतकऱ्यांनी गडावर पेरणी केली, अशा शेतकऱ्याऱ्यांची तूर डौलाने सक्षमपणे उभी आहे. फुलोर येण्यापासून तर शेंगा परिपक्व होईपर्यंतचा काळ हा अत्यंत महत्त्वाचा असल्याने या कालावधीमध्ये शेतकऱ्यांना दुर्लक्ष करता येत नाही. कारण या कालावधीमध्ये शेंगा पोखरणाऱ्या अळया आणि फवारणीवर करावा लागणार खर्चकिडींचे मोठ्या प्रमाणात



आक्रमण होते. त्याला प्रतिबंध म्हणून शेतकरी कोटकनाशकांची फवारणी करतात. या कालावधीत किडींनाप्रतिबंध केला नाही, तर तुरीचे उत्पादन घटते, रविवारपासून वातावरणात ढगाळपणा असून पंडीचे प्रमाणदेखील कमी जाणवत आहे. त्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना पिकावर कीड येण्याची भीती भेडसावत आहे. यावर्षी सोयाबीनचे उत्पन्न घटले असून, हाती आलेल्या उत्पादनाला भावदेखील अपेक्षेप्रमाणे मिळत नाही. तसेच परिसरातील संत्रा उत्पादकांनासुद्धा फार मोठा आर्थिक फटका बसला आहे. डिसेंबर महिन्याला प्रारंभ झाला तरी संत्रा फळांना अपेक्षेप्रमाणे भाव मिळत आधीच संकटात आहे. तशीच परिस्थिती कपाशी पीकाबाबत आहे. जवळपास संत्रा, सोयाबीन आणि कपाशी या पिकांबाबत खर्च वजा जाता फारसे उत्पन्न शिल्लक राहणार नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या सर्व अशा आता तुर या पिकाभोवती केंद्रित झाल्या आहे. आता निसर्ग अनुकूल राहीला, तरच तूर उत्पादकांचे स्वप्न साकार होऊ शकते; मात्र सद्यस्थितीमध्ये ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने तुरीवरही संकटाचे ढंग निर्माण झाले आहे.

# फलकलेखनातून मिळतेय सामान्य ज्ञान

## ज्ञानगंगा उपक्रम : उत्तमसरा शाळेच्या उपक्रमातून विद्यार्थ्यांना बक्षिसांची मेजवानी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२भातकुली–** प्रत्येक शाळेत फलक लेखनातून विद्यार्थ्यांना नवनवीन विषयांचे ज्ञानार्जन होते. पण जिल्हा परिषद माध्यमिक शाळा उत्तमसरातील विद्यार्थ्यांना शालेय विषयासह सामान्य ज्ञानाची माहिती तर मिळतेच याशिवाय सामान्य ज्ञानवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे उत्तरे दिल्यास बक्षीस सुद्धा प्राप्त होते. विज्ञान शिक्षिका शीतल भोपाळे (अथाटे) यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या ' ज्ञानगंगा घरोघरी ' या नवोपक्रमातून विद्यार्थी अधिक ज्ञानसमृध्द होत आहे.

नववर्षाचा संकल्प म्हणून शीतल भोपाळे ह्या शिक्षिकेने विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचा पाया मजबूत व्हावा म्हणून शाळेत दर्शनी भागातील फलकावर सामान्य ज्ञानवर आधारित ' ज्ञानगंगा ' हा उपक्रम सुरू केला. वर्गाबाहेरील फलकावर रोज सामान्य ज्ञानवर आधारित पाच प्रश्न दिले जातात. यामुळे दिवसभरात येता जाता विद्यार्थ्यांची नजर पडते. शिवाय अनेक विद्यार्थी हे प्रश्न वहीत लेखन करतात. दुसऱ्या दिवशी परिपाठात प्रश्नोत्तरे द्वारे याची उजळणी घेतल्या जाते. फलक लेखनावर आधारित उत्कृष्ठ वही लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना




शिक्षकांकडून बक्षीस सुध्दा देण्यात येते. शिवाय सामान्य ज्ञान लेखनावर आधारित चाचणी द्वारा यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीस दिल्या जाते. या उपक्रमकरिता शाळेतील मुख्याध्यापक लोमेश खैरकर, उमेश बसरे, संतोष कुरहेकर, चंद्र शेखर बाम्हणकर, अश्विनी झाडे, प्रतिभा नांदने, ज्योष्ना हायगले, भूषण बुरंगे प्राजक्ता भडके आदींचे सहकार्य लाभते.

### फलक लेखनात समाविष्ट बाबी:

सामान्य ज्ञान आधारित माहिती, संत, थोर माहात्म्य, सामान्य ज्ञानाच्या ट्रिक्स, गणिताच्या सोप्या ट्रिक्स, प्रश्न मंजुषा, दिनविशेष आदी विविधांगी माहितीचा समावेश.

**उपक्रम पोहचला सर्वत्र:-**

*शाळेतील सामान्य ज्ञानावर आधारित फलक लेखनाचे फोटो समाज माध्यमावर टाकल्यावर इतरांना ते आवडले. उपक्रमाला दिवसेंदिवस प्रतिसाद मिळत असल्याने नवीन सत्रात सामान्य ज्ञानाबरोबरच एक चॅलेंजिंग क्वेश्चनचे उत्तर देणाऱ्याचे नावं उमटू लागल्याने स्पर्धा आणखी रंगतदार झाली. समाजमाध्यमावरील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट दिल्याने त्यांचाही समावेश वाढला. समाज माध्यमामुळे शाळेतील उपक्रम सर्वत्र पोहचू लागला.

**उपक्रम पोहचला सर्वत्र:-**

*शाळेतील सामान्य ज्ञानावर आधारित फलक लेखनाचे फोटो समाज माध्यमावर टाकल्यावर इतरांना ते आवडले. उपक्रमाला दिवसेंदिवस प्रतिसाद मिळत असल्याने नवीन सत्रात सामान्य ज्ञानाबरोबरच एक चॅलेंजिंग क्वेश्चनचे उत्तर देणाऱ्याचे नावं उमटू लागल्याने स्पर्धा आणखी रंगतदार झाली. समाजमाध्यमावरील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन टेस्ट दिल्याने त्यांचाही समावेश वाढला. समाज माध्यमामुळे शाळेतील उपक्रम सर्वत्र पोहचू लागला.

# स्थानिक पातळीवर आघाड्या लागल्या कामाला

## पडघम वाजण्यापूर्वीच नगरपालिका निवडणुकीची लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ मोर्शी–** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपचा एकतर्फी विजय झालेला आहे. त्यामुळे येत्या काळात जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या चर्चाही सुरु झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर राजकीय पक्ष आणि स्थानिक आघाड्या कामाला लागल्या असून कोण किती जागा लढणार, कोणाची युती कोणासोबत होणार आदींची लगबग सुरु झाली आहे.

एका अंदाजानुसार येत्या काही महिन्यातच नगर परिषदेच्या निवडणुका होण्याची दाट शक्यता असून मोर्शी शहरातून डॉ. प्रदीप कु-हाडे, निलेश रोडे, नितीन उमाळे, विपुल भडांगे, रवींद्र गुल्हाने व मोहन मडघे यांचेसह अनेक उमेदवार आपले नशीब अजमावणार असण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने स्थानिक पुढाऱ्यांमध्ये चर्चेच्या फैरीही झडत आहेत. एकंदरीत शहरासह ग्रामीण भागात पुन्हा एकदा निवडणुकीचे वातावरण तयार होत आहे. या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवार व कार्यकर्ते सुद्धा काही दिवसातच पुन्हा सक्रिय होणार, अशी चिन्हे दिसून येत आहे. मोर्शी नगर परिषदेमधील नगराध्यक्ष व नगरसेवक यांचा कार्यकाळ २०२१ ला संपला. तेव्हापासून नगर परिषदेमध्ये प्रशासक कार्यरत आहे. नगराध्यक्ष व नगरसेवक सत्तेमध्ये नसल्याने शहरातील अनेक कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे नागरिकांनासुद्धा मोठा त्रास होत आहे. येत्या काही महिन्यातच नगर परिषदेची निवडणूक होणारअसल्याचे सुतोवाच केल्या जात असल्याने उमेदवारांच्या आशा पल्लवीत झालेल्या आहे.

## युवा सेनेच्या जिल्हा लोकसभा अध्यक्षपदी

# प्रवीण दिधाते यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२ अमरावती–** शिवसेना पक्षाच्या युवा सेना अमरावती लोकसभा अध्यक्षपदी जिल्ह्यातील युवा नेतृत्व प्रवीण प्रभाकरराव दिधाते यांची नियुक्ती करण्यात आली. प्रविण दिधाते हे गेल्या २० वर्षांपासून शिवसेनेत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्यरत आहेत. यापूर्वी भारतीय विद्यार्थी सेनेत त्यांनी शाखाप्रमुख ते जिल्हा प्रमुख व युवा सेनेत शहर प्रमुख ते जिल्हा प्रमुख अशा पदावर काम केले आहे. या माध्यमातून अनेक आंदोलने, विद्यार्थी प्रश्न, निवडणुकीत काम केले आहे. त्यांच्या कार्याची पावती म्हणून व शिवसेनेत पक्षनिष्ठ म्हणून त्यांच्यावर विश्वास टाकून शिवसेना पक्षाचे मुख्य नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, युवा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सूचनेनुसार,युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, सचिव किरण साळी यांनी युवा सेना अमरावती लोकसभा अध्यक्ष पदाची जबाबदारी प्रवीण दिधाते यांच्याकडे दिली. या नियुक्तीबद्दल युवा सेनेचे पश्चिम विदर्भाचे नेते ऋषी जाधव, विभागीय सचिव विठ्ठल सरप, समन्वयक ॲड. विराज निकम, निरीक्षक राहुल कराळे, शिवसेना अमरावती जिल्हाप्रमुख अरुण पडोळे, युवती सेनेच्या निरीक्षक दामिनी संजयराव राठोड, सौरभ नागोसे यांनी विशेष अभिनंदन केले. संपूर्ण जिल्ह्यातील शिवसेना, युवा सेना, महिला आघाडी व विविध सेलच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव प्रविण दिधाते यांच्यावर होत आहे. संपूर्ण जिल्ह्यात सहकार्याच्या सोबतीने आता युवा सेना संघटन आणखीन मजबूत करणार, असे मत प्रवीण दिधाते यांनी व्यक्त केले.

# मिरवणुकीत फटाके फोडल्यावरून वाद, धाडमध्ये दंगल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२बुलढाणा : –** बुलढाणा तालुक्यातील संवेदनशील स्थळ म्हणून ओळख असलेल्या धाड गावात शनिवारी रात्री उशिरा दंगल उसळली. क्षुल्लक कारणावरून दोन भिन्न धर्मीय गट एकमेकांमोर उभे ठाकल्यावर घोषणाबाजी करीत दगडफेक करण्यात आली. या संघर्षात काही जण जखमी झाले असून वाहनांची जाळपोळ करण्यात आल्याचे वृत्त आहे. यामुळे धाड नगरीत सध्या तणावपूर्ण परिस्थिती असून गावाला पोलीस छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

शनिवार, ३० नोव्हेंबर रोजी रात्री उशिरा हा घटनाक्रम घडला. टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त गावात मिरवणूक काढण्यात आली. प्रारंभी शांततेत चाललेल्या या मिरवणुकीदरम्यान फटाके उडवण्यावरून दोन गटांत वाद पेटला. शाब्दिक खडाजंगी झाल्यावर धक्काबुक्की झाली. याचे पर्यवसान तुंबळ हाणामारीत झाले. पाहतापहाता दोन्ही भिन्न धर्मीय गटाकडून तुफानी दगडफेक करण्यात आली.



मिरवणूक काढताना फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली आणि वाद उफाळून आला. दोन गट एकमेकांसमोर उभे ठाकले, प्रचंड राडा झाला. दोन्ही गटात दगडफेक करण्यात आली. वाहनांची जाळपोळ देखील करण्यात आली आहे. यामुळे काही वेळेतच जातीय दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. ही दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झाली असताना पोलीस दल घटनास्थळी पोहोचले. परिस्थितीवर नियंत्रण मिळवणे आणि जमावाला पांगवण्याचे प्रयत्न पोलिसांनी केले. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस अधिकारी अतिरिक्त पोलीस कुमकसह धाडमध्ये डेरेदाखल झाले. दंगल घटनास्थळ, मुख्य चौकात आणि संवेदनशील भागात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. यामुळे आज गावाला पोलीस छावणीचे स्वरूप आल्याचे चित्र आहे.

# भाऊ-बीजच्या माध्यमातून बांधले गेले आशा, अंगणवाडी सेविकांसोबत अनुपम बंध

## वलगावात सिकची चॅरिटेबल ट्रस्टकडून आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२वलगाव**

गावागावांत, कुटुंबा कुटुंबामध्ये बिघडलेले सामाजिक संबंध पूर्ववत करुन नवे अनुपम बंध तयार करण्याच्यादृष्टीने वलगावात भाऊ-बीज कार्यक्रम घेण्यात आला. निवडणुकीच्या आचारसंहितेचा अडसर असल्यामुळे तिथीनुसार न घेता शनिवारी हा कार्यक्रम घेण्यात आला. प्रकाश साबळे मित्र परिवार आणि प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्टने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

मूळच्या भारतीय असलेल्या आस्ट्रेलिया येथील प्रसिद्ध रसायनशास्त्रज्ञ डॉ. पवित्राताई गडलिंगे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य प्रकाश साबळे, विविध गावच्या सरपंच अर्चना तायडे, माला मोहोरे, कांता वाहने, नूतन काळे, ज्योस्तना मोहोड, कल्पना वाकोडे, माजी जि. प. सदस्य संगीता ठाकरे, प्रसिद्ध निवेदिका क्षिप्रा मानकर, प्रा.ज्योती यावलीकर, कविता विधळे, सविता बोबडे, माजी सरपंच वनिता लोखंडे आदी या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी होत्या.

वलगावच्या पंचक्रोशीतील गावांमध्ये कार्यरत आशा वर्कर, उमेद प्रकल्पातील महिला, अंगणवाडी सेविका, विविध महिला भजनी मंडळाच्या सदस्या आदी क्षेत्रातील सुमारे ४०० महिला या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या, गावागावांत,घरा-घरांत सध्या वेगवेगळे वातावरण तयार झाले आहे. समाजाच्या वेगवेगळ्या घटकांमध्ये घुसलेले प्रदुषण हे त्याचे मूळ कारण आहे. त्यामुळे कौटुंबीक सौहार्द कायम राखूनच आपल्याला या समस्येवर मात करणे शक्य आहे. प्रकाश साबळे यांनी आपल्या वक्तव्यादरम्यान सामाजिक कार्य करणाऱ्या माय-माऊली, भगिनींचा सन्मान करत त्यांच्या पाठिवर कौतुकाची थाप दिली.

सदर सोहळ्यादरम्यान माजी जि.प. सदस्या संगीता ठाकरे, कविता विधळे, प्रा.ज्योती यावलीकर यांनीही मनोगत व्यक्त केले. मंचावर विद्यापीठातील संत गाडगेबाबा अध्यासनाचे प्रमुख प्रा. दिलीप काळे, सिकची रिसोर्टचे व्यवस्थापक सचिन मालकर, सामाजिक कार्यकर्ते गजाननराव कडू आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान सर्व लाडक्या बहिणींनी सामूहिक औक्षण करून भाऊबीज साजरी केली. मान्यवरांच्या हस्ते भजनी महिला भगिनींना भजन दिंडीचा पिवळ्या रंगाच्या काठाच्या साडयाचा ड्रेसकोड प्रदान करण्यात आला तसेच आशावर्कर व इतर भगीनींना पितळच्या फुलारी भाऊबीज भेट रूपानं प्रदान करण्यात आल्या. संचालन सीमा पाखरे यांनी केले. आभार श्वेता उल्हे यांनी मानले. सोहळा यशस्वी करण्यासाठी राहुल तायडे, शशिकांत बोंडे, सुनील भगत, निलेश उभाड, अनुल्ला खान, विश्वंभर मार्के, ज्ञानेश्वर काळे ,गोपाल महल आदींनी परिश्रम घेतले.

**विविध धर्मगुरुंचे आशिर्वाद**

या कार्यक्रमाला रामदासजी सदार, भाई मुकेश सिंगजी, रघुनाथराव ठाकरे, भन्ते राजरतन, हाफिज अब्दुल रहीम व फादर जोस आदी विविध धर्माचे धर्मप्रमुख यांनी प्रामुख्याने उपस्थित राहून आशीर्वाद प्रदान केले.

# एक महिन्याच्या कालावधीतच गूड न्यूज कळेल; निलेश लंकेंच्या वक्तव्याने राजकीय चर्चांना उधाण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२पारनेर**

आपले भविष्य उज्ज्वल आहे. शेवटच्या श्वासापर्यंत तुम्हाला विसरणार नाही. भल्या भल्यांना नेस्तनाबूत करण्याची धमक व ताकद आहे. कोणी म्हणत असेल सरकार, आमदार आम्ही आहोत. मात्र, एका रात्रीत सत्तेत येऊन मांडीला मांडी लावून आम्हीही बसू शकतो. एक महिन्याच्या कालावधीतच एक गूड न्यूज कळेल, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार निलेश लंके यांनी केला आहे.

पारनेर तालुक्यातील सुपा येथे महाविकास आघाडीच्या चिंतन मेळाव्यात ते बोलत होते.पुढे बोलताना निलेश लंके म्हणाले की, एका निवडणुकीने मी खचणारा किंवा हताश होणारा नाही. लोकसभा निवडणुकीत ज्यांचा पराभव केला त्यांनी या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीनच्या माध्यमातून माझ्यावर ट्रॅप लावला, असा आरोप लंके यांनी केला. यावेळी राणी लंके, माधव लामखडे, बाळासाहेब हराळ, माणिकराव भोसले, खंडू भुकन, बाजार समिती सभापती बाबासाहेब तरटे, दीपक लंके, माजी नगरसेवक योगीराज गाडे, सुदाम पवार, अजय लामखडे, राजेंद्र चौधरी, शिवाजी व्यवहारे, नगराध्यक्ष नितीन आडसूळ, डॉ. बाळासाहेब कावरे, मारुती रेपाळे, राहुल झावरे, भाऊसाहेब काळे, सरपंच राजेंद्र शिंदे, गंगाराम बेलकर, भानुदास सातपुते, बंडू रोहोकले, रा. या. औटी, प्रा. भुजबळ, सुशीला ठुबे, नामाशेठ पवार, भागूजी दादा झावरे, शिवाजी जाधव, विश्वास



जाधव, उत्तम साळुंके, सुवर्णा धाडगे, वसंत ठोकळ, सतीश पालवे, किसन सुपेकर, शकुंतला लंके, ऐश्वर्या ढोरजकर, वंदना गंधाक्ते, डॉ. विद्या कावरे, राजेश्वरी कोठावळे, सरपंच वंदना ठुबे, सायली चेडे, अशोक घुले, ठकाराम लंके यांच्यासह पदाधिकारी, महिला उपस्थित होते. लंके म्हणाले, आपला काठावरचा पराभव निश्चितच चिंतनाचा विषय आहे. प्रतिष्ठानकडून आत्मचिंतन होणे गरजेचे आहे. त्यामुळे येणारा काळ आपला आहे. आम्ही खचत नाही. यापुढील काळात चुकीची दुरुस्ती करण्यासाठी काम करणार आहोत. आरोग्य, नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन करुन सुरुवात करणार आहे. मेळाव्यात ते बोलत होते.दरम्यान, आपल्या कामाच्या जीवावर आपण राज्यात ओळख निर्माण केली. आता हताश न होता. आपल्या चुका दुरुस्त करा. समाजाला दोष देऊ नका. पोस्टलला मताधिक्य असेल तर उमेदवार विजय व्हायचा. परंतु, या विधानसभा निवडणुकीत उलटे झाले आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत बराच फरक आहे. काहीसा गाफीलपणा नडला. परंतु, पारनेरच्या जनतेसाठी जास्तीत जास्त वेळ देण्याचा प्रयत्न करत आहोत, असे लंके यांनी सांगितले.

# तीनही पक्षांमध्ये चांगला समन्वय; लवकरच राज्याच्या हिताचा निर्णय: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२सातारा**

'सीएम' म्हणजे फक्त चीफ मिनिस्टर नव्हे, तर कॉमन मॅन. मी कॉमन मॅन व जनतेचा मुख्यमंत्री म्हणून काम केले. अडीच वर्षांत जेवढ्या योजना राबविल्या, तेवढ्या आजपर्यंत कोणीही राबविल्या नसतील. माझ्या नेतृत्वाखाली विधानसभा निवडणुका लढल्या गेल्या. दोन्ही उपमुख्यमंत्री सोबत होते. जनतेने भरभरून दिले आहे. त्यामुळे जनतेला काय देतोय हे महत्त्वाचे आहे. माझा निर्णय बुधवारी पंतप्रधान मोदी, अमित शाह यांना कळविला असून, मुख्यमंत्रिपदाबाबत त्यांच्या निर्णयाला पाठिंबा आहे. त्यामुळे किंतु-परंतु नसावा,' असे प्रतिपादन काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. दरे (ता. महाबळेश्वर) येथे दोन दिवसांपासून मुक्कामी असलेल्या शिंदे यांनी रविवारी ठाण्याकडे रवाना होण्याच्या दिवशी पत्रकारांशी संवाद साधून आपली भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट केली. शिंदे म्हणाले, 'अमित शाह यांच्यासमवेत एक बैठक झाली असल्याचे हि ते म्हणाले.

# मुख्यमंत्र्याच्या शपथविधी सोहळ्याआधी नागपूरमध्ये चेहरा नसलेल्या नेत्याचे बॅनर्स, काय आहे संकेत?




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालात भाजपसह महायुतीने दमदार कामगिरी करत विजय प्राप्त केला. मागील आठवड्यात लागलेल्या निकालात महायुतीच्या तीन पक्षांनी मिळून दोनशेच्यावर जागा जिंकल्या. यात एकट्या भाजपने १३२ पेक्षा अधिक जागांवर विजय प्राप्त केला. या दमदार विजयानंतर राज्यात तात्काळ सरकार स्थापित होऊन मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा पार पडेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र निकालाच्या दहा दिवसानंतरही राज्याचे मुख्यमंत्रीपद कुणाला मिळेल याबाबत अधिकृत घोषणा झालेली नाही. यंदा मुख्यमंत्रीपद सर्वात मोठा पक्ष असल्याने भाजपच्या खात्यात जाणार हे निश्चित झाले आहे, मात्र मुख्यमंत्री कोण राहील याबाबत अद्यापही स्पष्टता नाही. अशा स्थितीत नागपूरमध्ये जागोजागी लागलेले फलक लक्ष वेधून घेत आहे. मुख्यमंत्रीपदी विराजमान होणाऱ्या नेत्याचे संकेत देत आहेत. या फलकावर लोकांकडे बघत असलेले एक नेते गर्जना करत असल्याचे दाखविण्यात आले.

**'फिर वापस आना पडता है'**

शहरातील शंकरनगर चौकात लागलेल्या एका फलकावर लोकांकडे बघत असलेले एक नेते गर्जना करत असल्याचे दाखविण्यात आले. यात हिंदीमध्ये 'वापस आना पडता है, फिर वापस आना पडता है ' अशाप्रकारचे हिंदीतील वाक्य लिहिले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे या फलकावर कोणत्याही पक्षाचे, संस्थेचे किंवा व्यक्तीचे नाव नाही. केवळ एका चित्रासह हिंदी भाषेतील ओळी लिहिण्यात आल्या आहेत. 'पत्थर की बंदिश से भी क्या नदिया रुकती है, हालातो की धमकी से क्या अपनी नजरे झुकती है, किस्मत से हर पन्ने पर किस्मत लिखवाना पडता है, जिसमे मशाल सा जज्बा हो, वो दीप जलाना पडता है, वापस आना पडता है, फिर से वापस आना पडता है' अशाप्रकारच्या या ओळी आहे. मुख्यमंत्री पदाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर हे बॅनर चर्चेचे विषय ठरत आहे.

**'मी पुन्हा येईल'**

अशाप्रकारचे एक दुसरे बॅनर घाटरोड चौकात बघायला मिळाले. यात देखील एक नेता लोकांकडे बघत जोरदार गर्जना करत असल्याचे दाखविण्यात आले आहे. मी पुन्हा येईल या शीर्षकाखाली पुन्हा का येईल याची विविध कारणे सांगण्यात आली आहेत. यात गावांना जलयुक्त करण्यासाठी, शहरांचा चेहरा बदलण्यासाठी, महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी, युवकांना अधिक सक्षम करण्यासाठी पुन्हा येईल असे दर्शविण्यात आले आहे. 'नव महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी मी पुन्हा येईल' हे बॅनर देखील लक्षवेधी ठरत आहे.

# तिवसा, धामणगाव, चांदूर रेल्वे पंचायत समित्यांवर १५ तारखेपासून असणार प्रशासकराज

## निवडणुका लांबणीवर : सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्रशासकांचा ताबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

धामणगाव तालुक्यासाठी चांदूर रेल्वे व तिवसा तालुक्याचे विभाजन करण्यात आले. तेव्हापासून या तिन्ही तालुक्यांत पंचायत समित्यांच्या निवडणुका इतर पंचायत समित्यांसोबत न होता स्वतंत्रपणे होत आहेत. या तीनही पंचायत समित्यांचा कार्यकाळ १४ डिसेंबरला संपुष्टात येत आहे. अद्याप प्रभागरचना, आरक्षण सोडत न झाल्याने या पंचायत समित्यांवर डिसेंबरपासून १५ प्रशासकाची नियुक्ती होणार आहे.




विद्यमान बीडीओ हेच पंचायत समितीचे प्रशासक राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले. जिल्हा परिषदेचा कार्यकाल २० मार्च २०२२ पासून संपुष्टात आलेला आहे, तर चिखलदरा, चांदूर बाजार, मोर्शी, वरुड, अमरावती अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, भातकुली व नांदगाव पंचायत समितीचा कार्यकाळही १३ मार्च २०२२ पासून संपुष्टात आला आहे. तेथेदेखील प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी आरक्षणाचे मुद्द्यावर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे या पं. स.ची प्रभागरचना व आरक्षण प्रक्रिया आटोपली असतानाही आयोगाद्वारे निवडणूक कार्यक्रम लावण्यात आला नाही. परिणामी जिल्हा परिषदेसह ११ पंचायत समिती, मनपा व सर्व नगर परिषद व नगरपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली आहे. उर्वरित तीन पंचायत समित्यांमध्ये लोकनियुक्त पदाधिकारी होते. आता या ठिकाणीदेखील प्रशासकराज राहणार आहे.

**प्रभागरचना, आरक्षण सोडत झालेली नाही**

तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव रेल्वे पंचायत समितीची मुदत १४ डिसेंबर २०२४ रोजी संपुष्टात येत आहे. या पार्श्वभूमीवर तीन महिन्यांपूर्वी प्रभागरचना व आरक्षण सोडतीचा कार्यक्रम व्हायला पाहिजे होता. मात्र या तिन्ही तालुक्यांत आयोगाद्वारे ही प्रक्रिया करण्यात आलेली नाही. त्यामुळे या पंचायत समित्यांच्या निवडणुका न होता प्रशासकांची नियुक्ती करण्यात येणार आहे.

**एकत्रित निवडणूक होण्याची दाट शक्यता**

जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या ५९ वरून ६६ पर्यंत करण्यात आल्याने पंचायत समितीची सदस्यसंख्या ११८ वरून १३२ झालेली आहे. आता लवकरच निर्णय होऊन न्यायालयीन प्रकरण निकाली निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे जि.प. व सर्व पंचायत समिती व काही दिवसांच्या फरकात नगर परिषद, नगरपंचायत व मनपाची निवडणूक होण्याची शक्यता असल्याची चर्चा प्रशासनात आहे.

**प्रशासकांमुळे विधानपरिषदेची निवडणूक रखडली**

विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांचा कार्यकाळ २२ जून २०२४ ला संपुष्टात आलेला आहे. या मतदारसंघात सन २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत ४८८ मतदार होते. यंदा तिवसा, चांदूर रेल्वे व धामणगाव पंचायत समिती वगळता सर्व स्थानिक संस्थांवर प्रशासक आहे. या सर्व ठिकाणी सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत मतदार यादी होऊ शकत नाही. प्रशासकराजमुळे ही निवडणूक रखडली आहे. पं।स, चे फक्त सभापतीच यामध्ये मतदार आहेत.

# ४ कोटींचा प्रीमियम भरला, १३ कोटींची भरपाई मिळाली!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

मागच्या हंगामात फळपिकांच्या आंबिया बहरासाठी ३,४९८ शेतकऱ्यांनी फळपीक विमा योजनेत सहभाग घेतला. यासाठी ३.९४ कोटींचा हप्ता कंपनीकडे भरणा केला. त्या तुलनेत ३४३८ उत्पादकांना १३.०६ कोटींचा परतावा मंजूर झाला आहे. यापैकी काही शेतकऱ्यांना तो मिळाला तर काहींचा प्रक्रियेत असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

फळपीक विमा २०२३-२४ साठी जिल्ह्यातील ३४३८ शेतकऱ्यांना केळी, संत्रा व मोसंबी पिकांकरिता १३,०५,८६,७५५ रुपयांचा परतावामिळणार आहे. केळीसाठी अचलपूर, परसापूर, पथ्रोट, रासेगाव, अंजनगाव, भंडारज, सातेगाव व विहीगाव मंडळांमधील शेतकरी, मोसंबीसाठी मोर्शी, शिरखेड, लोणी, पुसला, राजुरा बाजार, शेंदूरजना घाट व वाठोडा मंडळ,संत्राकरिता पथ्रोट, अचलपूर, असदपूर, परतवाडा, परसापूर, रासेगाव, डवरगाव, अंजनगाव, निंबा, बेलोरा, भंडारज, कापूसतळणी, सातेगाव, विहीगाव, आमला, चांदूर रेल्वे, पळसखेड, सातेफळ, ब्राह्मणवाडा, आसेगाव, चांदूरबाजार, करजगाव, शिरजगाव कसबा, तळेगाव मोहणा, अंजनसिंगी, अंबाडा, धामणगाव, हिवरखेड, मोर्शी, नेरपिंगळाई, रिद्धपूर, शिरखेड, धाबा, कुन्हा, मोझरी, वहा, वरखेड, बेनोडा, लोणी, पुसला, राजुरा बाजार, शेंदूरजना घाट, वरुड व वाठोडा सर्कलमध्ये योजनेत समाविष्ट काही शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेला आहे.

# लग्नाच्या खर्चात शाही ताट परवडेना; जिलेबी अन् जामूनचे ताटही महागले

## किराणा अन् गॅस दरवाढीने कॅटरर्सनी ताटाची किंमत वाढविली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२ अमरावती**

तुळशी विवाहानंतर आता सर्वत्र लग्नाचा बार उडणार असला, तरी महागाईमुळे जेवणाच्या पंगतीचा खर्च वाढणार आहे. पेट्रोल, डिझेल, गॅस सिलिंडरसह खाद्यपदार्थांचे दर वाढल्याने आता कॅटरर्सनीदेखील ताटाची किंमत वाढविली आहे. त्यामुळे आता लग्नाचा खर्च काढताना वऱ्हाडींना जेऊ घालण्यासाठी शाही ताटाची किंमत परवडत नसल्याने जिलेबी अन् जामूनच्या ताटालाच अधिक मागणी असल्याचे दिसून येत आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून गॅस सिलिंडर, डिझेलसह इंधनाच्या दरात वाढ झाली आहे. इंधनातील या दरवाढीमुळे जवळपास सर्वच किराणा सामानाचे दर महागले आहेत. दुसरीकडे जागतिक बाजारपेठेत भडकलेल्या खाद्यतेलाने आपल्याकडेही महागाईचा कळस गाठला आहे. सामान्य मध्यमवर्गीय लोकांसाठी



असलेल्या मंगलकार्यालयात साधा शिरा-भाताचे जेवण असेल तर पूर्वी ताटाला ८०-१०० रुपये द्यावे लागत होते. आता या पदार्थांच्या जेवणाचे ताट १२० ते १३० रुपयांवर पोहोचले आहे.तसेच साधा भात, मसाले भात, वांगी-बटाटा भाजी, आमटी, कोशिंबीरसह एखादे पक्वान्न अशा ताटाचे दर दीडशे रुपयांपर्यंत पोहोचले आहेत. पुरीसह बासुंदी, श्रीखंड, अंगूर मलई अशा विशिष्ट पदार्थांची मागणी असेल तर त्यासाठी ३०० ते ५०० रुपये प्रतिताट मोजावे लागत आहेत. दोन महिन्यांपूर्वी या पदार्थांचे ताट २२५ ते २५० रुपयांपर्यंत मिळत होते.



भाजीपाला, खाद्यपदार्थांच्या कच्च्या मालाचे दर वाढले आहेत. दोन हजारात मिळणारी व्यावसायिक गॅस टाकी २४०० रुपयांना झाली. एरवी ३०० रुपयांमध्ये मिळणारे कामगार आता सीझन सुरू असल्याने ५०० ते ७०० रुपयांशिवाय कामावर यायला तयार होत नाहीत. तसेच आठशे ते हजार रुपयांवर काम करणारा आचारी आता १५०० रुपये घेत आहे. वाहतुकीचा खर्चदेखील वाढला आहे.

**रवी देशमुख, क्षितिज पॅलेस अँड केटरिंग सर्व्हिस**

**दरवाढीचे हे आहे कारण..**

दोन महिन्यांपूर्वी १८०० रुपयांना मिळत असलेला १५ लिटर खाद्यतेलाचा डबा सध्या २००० ते २२०० रुपयांवर पोहोचला आहे. ८० ते १०० रुपये किलो मिळणारा बासमती तांदूळ १२० ते १४० रुपयांवर पोहोचला आहे. सर्वच डाळींनी शंभरी गाठली आहे. दूध आणि दुग्धजन्य पदार्थाचे दर वाढले आहेत. गुलाबजामूनसाठी लागणाऱ्या खव्याचे दरही वाढले आहेत. परिणामी कार्यालयातील भोजनावळीचे दरही वाढले असल्याचे कॅटरिंग व्यावसायिक सांगतात.

# शिवशाही बस अपघात प्रकरणी धक्कादायक माहिती

## चालकाने या पूर्वी ५ वेळा केला होता अपघात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२भंडारा**

गोंदिया जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा गावाजवळ २९ नोव्हेंबर रोजी भंडारा डेपोच्या शिवशाही बसला भीषण अपघात घडला होता. या अपघातात तब्बल ११ जणांनी नाहक प्राण गमावले. या प्रकरणी एसटी महामंडळाच्या भंडारा विभागीय अधिकाऱ्यांनी चालकाला निलंबित केले असून या प्रकरणात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

भंडारा इथून गोंदियाकडे प्रवासी घेऊन निघालेली शिवशाही बस सडक अर्जुनी तालुक्यातील डव्वा गावाजवळ उलटली. भरधाव वेगाने बस चालविणाऱ्या चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला होता. या अपघातात ११ निष्पाप प्रवाशांचा मृत्यू झाला. या प्रकरणी आता एसटी महामंडळाच्या भंडारा विभागीय अधिकाऱ्यांनी शिवशाही बस चालक प्रणय रायपूरकर याच्यावर निलंबनाची कारवाई केली आहे.

या अपघातास कारणीभूत ठरलेला चालक रायपूरकर याच्या हाताने यापूर्वी पाच किरकोळ अपघात झाले आहेत. त्यानंतर या चालकाला पुन्हा प्रशिक्षण देण्यात आले होते. अशी माहिती विभाग





नियंत्रक काळमेघ यांनी दिली. मात्र पाचवेळा एखाद्या चालकाकडून अपघात झाल्यानंतर त्याच्यावर एसटीच्या विभागस्तरावरून काय कारवाई झाली, त्याच चालकाला पुन्हा शिवशाही चालवण्याची परवानगी का देण्यात आली, असे अनेक प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहेत. सध्या मृतांचा आकडा ११ वर असला तरी अनेक प्रवासी गंभीररित्या जखमी झाले आहेत. त्यापैकी अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व येणार असल्याचे सांगण्यात येते.प्रणय रायपूरकर याच्या आजवरच्या सेवा काळाची पार्श्वभूमी अपघाताच्या घटनांची असताना त्याकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात झाला, असे बोलले जात आहे. दरम्यान, वेळ काढून नेण्यासाठी आजही प्रशिक्षण न घेतलेल्या काही चालकांच्या हाती देखील शिवशाही दिली जात असल्याचे एका कर्मचाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. विभाग नियंत्रक काळमेघ यांनी मात्र हा आरोप फेटाळला आहे.

# नागपूर हिवाळी अधिवेशनाची तयारी, मंत्र्यांना बंगले; कर्मचारी एका खोलीत चार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी मंत्र्यांसाठी स्वतंत्र बंगले, सचिवांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली जाते. मात्र, मोठ्या संख्येने येणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका खोलीत चार ते पाच जणांना राहावे लागते. विधिमंडळ सचिवालयाने नागपूर अधिवेशनासााठी येणाऱ्या क र्मचाऱ्यांच्या निवासव्यवस्थेबाबत एक परिपत्रक काढले आहे. त्यातून वरील बाब स्पष्ट झाली आहे.



राज्यात नवे सरकार स्थापन झाले नसल्याने अद्याप हिवाळी अधिवेशनाची तारीख निश्चित झालेली नाही. साधारणपणे १६ डिसेंबरपासून सुरुवात होईल, असा अंदाज प्रशासकीय वर्तुळातून व्यक्त केला जात असून त्यानुसारच तयारी सुरू आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मुंबईतून अधिवेशनासाठी नागपुरात येणाऱ्या सचिवालयातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या निवासव्यवस्थेची जबाबदारी असते. यासाठी नागपुरात कायमस्वरूपी १६० खोल्यांचे गाळे बांधण्यात आले आहे. यावेळी यासाठी नवीन इमारत बांधण्यात आली आहे. मात्र, ती पुरेशी नसल्याने एका खोलीत चार ते पाच अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या मुक्कामाचे नियोजन सचिवालयाने केले आहे. सचिवालयाच्या परिपत्रकानुसार एका खोलीत गट अ मधील चार अधिकारी व गट ब, क आणि ड श्रेणीतील पाच कर्मचाऱ्यांसाठी एक खोली, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. एकीकडे मंत्री, राज्यमंत्र्यांसाठी स्वतंत्र बंगले, स्वतंत्र गाळ्यांची व्यवस्था करण्यात आली असताना दुसरीकडे कर्मचाऱ्यांना मात्र एका खोलीत दोनहून अधिक कर्मचारी,अधिकाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**गटनिहाय नावे मागवली**

एका खोलीत एकाहून अधिक कर्मचारी, अधिकारी राहणार असल्याने त्यांच्यात समन्वय असावा यासाठी विधिमंडळ सचिवालयाने कर्मचाऱ्यांकडून चार किंवा पाच कर्मचाऱ्यांचा गट तयार करून त्यानुसार नावे कळवण्याचे आवाहन केले आहे. त्या गटानुसारच खोल्यांचे वाटप केले जाणार आहे. इतरांना त्या खोलीत प्रवेश नसेल. एखाद्या गटाकडून कमी नावे प्राप्त झाल्यास रिक्त जागी नावे सचिवालयाच्या माध्यमातून त्यात समाविष्ट केली जाणार आहेत. पाच डिसेंबरपर्यंत ही नावे कळवायची आहेत. अनेक कर्मचारी त्यांची नावे खोल्यांमध्ये निवासासाठी देतात, मात्र त्यांचा मुक्काम हा नागपुरातील नातेवाईकांकडे असतो. अशा कर्मचाऱ्यांनी नावे कळवू नये, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. काही कर्मचाऱ्यांची नागपूर अधिवेशनासाठी नियुक्ती झालेली नसतानाही त्यांची नावे निवासव्यवस्थेसाठी देतात. त्यांच्यासाठी जागा राखीव ठेवली जाणार नाही, शिवाय ही बाब उघडकीस आल्यास शिस्तभंग कारवाई केली जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ टेबल टेनिस (पुरुष) स्पर्धेकरीता विद्यापीठाची चमू घोषित



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

अवदेश प्रताप सिंह विद्यापीठ, रेवा (मध्यप्रदेश) व्दारा आयोजित व एस.आर.के. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट, सतना (मध्यप्रदेश) येथे २९ डिसेंबर, २०२४ ते ०१ जानेवारी, २०२५ दरम्यान होणा–या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ टेबल टेनिस (पुरुष) स्पर्धेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संघाची चमू घोषित करण्यात आली आहे.

चमूमध्ये शारीरिक शिक्षण महाविद्यालय, यवतमाळचा ओम पालेकर, एच.व्ही.पी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा आदर्श कदम, एस.एस.जी.एम. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, शेगांवचा अनिकेत गज्जलवार, उज्वल शर्मा व श्रेयस कोकाटे, एस.एस.एस.के.आर. इंद्राणी महाविद्यालय, कारंजा लाडचा प्रितेश मर्दाने आणि डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा श्री नलिंदर यांचा समावेश आहे. निवड झालेल्या सर्व खेळाडूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूचा प्रशिक्षण वर्ग विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथे दि. १६ ते २५ डिसेंबर दरम्यान होणार आहे. प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या संचालक डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी संपर्क साधता येईल.

# विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळेच अभूतपूर्व यश - प्रविण पोटे पाटील

## भाजपाच्या दैदिप्यमान यशाबद्दल भाजपा अमरावती शहर जिल्ह्याच्या वतीने विजयउत्सव साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ नुकत्याच संपन्न झाल्या या निवडणुकीमध्ये महाराष्ट्रात भाजपाने अभूतपूर्व यश संपादन केले. कमळ हे भाजपा चे चिन्ह महाराष्ट्रात सर्वत्र परिचित आहे या चिन्हावर निवडणूक लढविण्यास अनेक उमेदवार इच्छुक असतात निवडूनही येतात जागावाटपात अमरावती शहराची जागा महायुतीतील राष्ट्रवादी पक्षाला सुटली, अमरावती शहरात भाजपाच्या कमळ या चिन्हावर उमेदवार नसतांना सुद्धा महायुतीच्या उमेदवार यांना घड्याळ चिन्हावर निवडून आणण्यात भाजपा अमरावतीचा



सिहाचा वाटा असून यामध्ये सर्व भाजपा पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख, बूथ प्रमुख, मंडळ अध्यक्ष, मोर्चा अध्यक्ष, प्रकोष्ठ सेल आघाडी, नगरसेवक यांनी फार अपार मेहनत घेतली व विजय संपादन केले. कुठलेही यश एकट्याच्या जोरावर मिळत नसते प्रत्येक कार्यकर्ते, पदाधिकारी यांचा वाटा यश संपादन करण्यात असतो अमरावती शहरातील, जिल्ह्यातील तसेच महाराष्ट्रातील मिळालेले यश हे कार्यकर्त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या दिवसरात्र मेहनतीमुळेच मिळाले असून या यशाचे पाईक असणाऱ्या कार्यकर्त्यांचा मानसन्मान हा नेहमी झालाच पाहिजे असे प्रतिपादन भाजप अमरावती शहर अध्यक्ष मा.आ. प्रविण पोटे पाटील यांनी केले. सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांचे अभिनंदन करत शुभेच्छा यावेळी प्रवीण पोटे पाटील यांनी दिल्या , यापुढेही होणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत संघटित होऊन काम करणे तसेच भाजपा सदस्यता अभियान शहरात राबवून जास्तीत जास्त नागरिक भाजपा सोबत जुळविण्याचे आवाहन यावेळी प्रविण पोटे पाटील यांनी उपस्थितांना केले.

या विजयउत्सवाच्या वेळी जयंत डेहनकर ,निवेदिताताई दिघडे,चेतन पवार, बादल कुळकर्णी, सतिश करेसिया, विवेक कलोती, सुरेखाताई लुंगारे ,अनिताताई राज, गंगाताई खारकर, कौशिक अग्रवाल, लताताई देशमुख सह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# चिखलीच्या अंचरवाडी येथे आकाशातून संयंत्र वजा उपकरण शेतात पडले

## गाव परिसरासह उडाली एकच खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२बुलढाणा**

बुलढाणा जिल्ह्यात आज सोमवारी, २ डिसेंबर रोजी ढगाळ वातावरण असून तुरळक पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मात्र चिखली तालुक्यातील अंचरवाडी येथे पाऊस तर पडला नाही, पण भलतीच वस्तू पडल्याने गाव परिसरासह चिखली तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे. अंचरवाडी येथे आकाशातून एक संयंत्र वजा उपकरण पडले आहे. एका मोठ्या फुग्याला बांधलेले हे संयंत्र (उपकरण) आहे. अंचरवाडी येथील शेतकरी गावातील संजय सिताराम परिहार यांच्या शेतात हे यंत्र पडले आहे. आज सोमवारी २ डिसेंबर रोजी, सकाळी संजय परिहार यांचा मुलगा अविनाश परिहार आणि चुलत भाऊ वैभव परिहार हे नित्यनेमानुसार कामानिमित्त शेतात गेले होते. यावेळी त्यांना दूरवरून शेतात काही तरी वेगळंच पडलेले दिसून आले.

दोघांनी जवळ जाऊन पाहिले असता त्यांना मोठ्या फुग्याला (बलूनला) जोडलेले हे यंत्र दिसून आले. अविनाश , वैभव यांनी याची माहिती देताच गावकरी, नातेवाईक यांनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच ही माहिती काही प्रसिद्धी माध्यम प्रतिनिधींना दिली. दरम्यान पोलीस आणि महसूल चे कर्मचारी दाखल झाले. हे उपकरण हवामान खात्याने सोडले असावे असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला . मात्र त्या उपकरणवर कोरियन भाषेत मजकूर असल्याने गूढ वाढले. दरम्यान, उपकरण कशाचे आहे? याबद्दल दुपारी बारा वाजेपर्यंत माहिती मिळू शकली नाही. मात्र यंत्रावर कोरियन भाषेतील मजकूर असून या यंत्रांची निर्मिती कोरिया मध्ये झाल्याचा उल्लेख आहे.


**हवामान खाते म्हणते**

दरम्यान यासंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी संभाजी पवार यांना विचारणा केली असता त्यांनी असे उपकरण पडल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला.आपण निवासी उप जिल्हाधिकारी यांना याची कल्पना दिली असल्याचे सांगितले. तसेच प्रादेशिक हवामान विभागाचे नागपूर केंद्राच्या अधिकाऱ्यासोबत चर्चा केल्याचे सांगितले. हे हवामान विषयक उपकरण असून आमच्या संगणक प्रणाली सोबत जोडलेले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे प्रादेशिक हवामान खात्याच्या नागपूर केंद्राने स्पष्ट केल्याचे संभाजी पवार म्हणाले.

# रेल्वे रुळालगत १,२०० किलोमीटरची सुरक्षा भिंत उभारणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२नागपूर**

रेल्वे रुळांवर प्राणी किंवा इतर कोणीही येऊ नये, गाड्यांना वेगाने धावता यावे म्हणून मध्य रेल्वे विभाग रुळाशेजारी सुमारे १,१४१ कोटी रुपये खर्चून १२०० किलोमीटर लांब संरक्षक भिंत उभारणार आहे. रेल्वेच्या पायाभूत सुविधात वाढ करण्यात येत आहे. त्याअंतर्गत नागपूर ते इटारसी, नागपूर ते सेवाग्राम, सेवाग्राम ते बल्लारपूर तसेच नागपूर ते राजनांदगाव दरम्यान नवीन रेल्वेमार्गाचे तिहेरी, चौपदरीकरण सुरू आहे. शिवाय वंदे भारत आणि इतर 'सेमी हायस्पीड' गाड्या सुरू करण्यावर रेल्वेचा भर आहे.




रेल्वे रुळांच्या दोन्ही बाजूला अनेक ठिकाणी लोकवस्त्या आहेत. तसेच काही भागात प्राण्याचा वावर असतो. रेल्वे रुळांपासून मानव आणि प्राणी दूर राहावे. तसेच रुळांना कुणी नुकसान पोहचवू नये, यासाठी ही भिंत उभारण्यात येत आहे. यामुळे रेल्वे रुळ अधिक सुरक्षित होतील आणि रेल्वेगाड्यांचा वेग वाढेल. तसेच रेल्वेगाड्यांना विलंब होण्याचे प्रमाण कमी होईल. रुळांशेजारी संरक्षक भिंत उभारल्याने वन्य प्राण्यांचे अपघातही कमी होतील, अशी अपेक्षा प्रशासनाला आहे. रुळांवर आत्महत्येचे प्रमाणही वाढले आहेत. संरक्षक भिंतीमुळे ते देखील टाळता येईल, असा सुरक्षा अधिकाऱ्यांचा दावा आहे.

इटारसी ते आमला दरम्यानच्या २२ किलोमीटरच्या पट्ट्यात संरक्षक भिंती उभारण्याचे काम पूर्ण झाल्याची माहिती मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांनी दिली. सेवाग्राम ते नरखेड दरम्यान ३० कोटी रुपये खर्चाचा ३८ किलोमीटरचा मार्गही पूर्ण झाला आहे. काळा पत्थर–पोळा पत्थर–मगदोह (नागपूर–भोपाळ विभाग) दरम्यानची संरक्षक भिंतही पूर्ण झाली आहे. काही विभागांमध्ये निविदा प्रक्रिया सुरू आहे, तर काही भागात काम पूर्ण होत आहे, असे मित्तल म्हणाले.

# डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयात किडणी प्रत्यारोपन यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, रूग्णालय व अनुसंधान केंद्र येथे अलीकडेच पहिले किडनी प्रत्यारोपन शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. भुसावळ येथील रूग्ण मनीष कुंदन कश्यप याला त्याची बहीण चंचल सचिन सिकरवार यांनी एक किडनी देऊन जीवनदान दिले. शस्त्रक्रिया पश्चात रूग्णावर आयसीयू मध्ये दहा दिवस



वैद्यकीय उपचार घेऊन रुग्णाला सुस्थितीत सुटी देण्यात आली.

ही संपूर्ण शस्त्रक्रिया शासनाच्या महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत मोफत करण्यात आली. तसेच रूग्णाच्या ब–याच शस्त्रक्रिया पुर्व चाचण्या देखील रुग्णालय स्तरावरून मोफत करण्यात आल्या. ज्यामुळे रूग्णाला बराच दिलासा मिळाला.यावेळी अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी रूग्णाला पुष्पगुच्छ देऊन पुढील आयुष्याकरीता आरोग्यदायी शुभेच्छा दिल्या व शस्त्रक्रिया पश्चात काय काळजी घ्यायची याबाबत मार्गदर्शन केले. रूग्णाच्या नातेवाईकांनी सर्व संबंधीत स्टाफला शाल व श्रीफळ देऊन आभार व्यक्त करून रुग्णालयीन सेवेबाबत समाधान व्यक्त केले.रूग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. पवन टेकाडे, नेफ्रोलॉजीस्ट डॉ. निखिल बडनेरकर, रुग्णालय व्यवस्थापक डॉ. श्रीकांत फुटाणे, ऋग्वेद देशमुख, ट्रान्सप्लांन्ट कोर्डिनेटर सतीश वडनेरकर, डॉ. सत्वीर कौर, केटीआयसीयू स्टाफ लीना ठाकूर, पल्लवी निस्वादे, डेलिया मेघवा, एमजेपीजेवाय कार्यालयाचे धनराज चव्हाण, पदमा साखरे, वैष्णवी धर्माळे तसेच रुग्णाचे नातेवाईक सचिन सिकरवार, पुजा कश्यप, मनिष चव्हाण, विनोद चव्हाण, सर्वेश सिकरवार उपस्थित होते.

# गणवेश शिवून घेण्याच्या आदेशाची पायमल्ली..! 'निकृष्ट गणवेश' दिल्याने नाराजी

## कापड खराब असून शिलाई सहजपणे उसवत आहे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२अमरावती**

२०२४ शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेचा लाभ शासनाच्या वतीने अमरावती जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिलाई करून देण्याबाबत आदेश आहे. मात्र, सहा महिने झाले तरी विद्यार्थ्यांना मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले नव्हते. स्थानिक ठेकेदाराऐवजी बाहेरील ठेकेदाराने पूर्ण तालुक्यात एकत्रितरीत्या निकृष्ट गणवेश पुरवले होते.



मात्र सध्या जिल्ह्यातील बहुतांश शाळांमध्ये निकृष्ट गणवेशाचेच वाटप केले आहे. सदर गणवेशाचे कापड खराब असून शिलाई सहजपणे उसवत आहे.कापड फाटत आहे. अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या मापाचे गणवेश मिळालेले नाहीत. सदरचे दर्जाहीन खराब गणवेश पुरंदरमधील विद्यार्थ्यांना दिल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये नाराजीचा सूर आहे. विध्यार्थ्यांना निकृष्ट गणवेशाचे वाटप झाले असून काय आहे योजना? गणवेशासाठी राज्यस्तरावरून उत्कृष्ट कापड मिळणार होते.

सदर कापडाचे तालुकास्तरीय समितीने काळजीपूर्वक तपासणी करून स्थानिक महिला बचत गटांमार्फत गणवेशाची उत्कृष्ट शिलाई करून घेण्याबाबत शासन आदेश आहे.मात्र शासन आदेशाची पायमल्ली करुन तालुक्याच्या बाहेरील ठेकेदाराकडून अधिकाराचा दुरुपयोग करून निकृष्ट गणवेश वाटप करण्यामागे 'अर्थकारण' असल्याचा संशय आहे. महिला बचत गट कारागिरांचा रोजगार हिरावल्याचा संताप व्यक्त करत दोषींवर कारवाईची मागणी करणार असल्याचे स्थानिक महिला बचत गटाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.